# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

प्रभात मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०१५

# आत्मविश्वास, इच्छाशक्तीने व्यसनमुक्ती शक्य

## झुंबरराव खरो यांचे प्रतिपादन : राजगुरू महाविद्यालयात मार्गदर्शन

**राजगुरूनगर, दि. २१ (प्रतिनिधी)** - समाजात व्यसनाधीन तरुणांची वाढलेली संख्या चिंता करायला लावणारी असून, व्यसनमुक्तीसाठी कुठलेही औषध उपलब्ध नाही. मात्र, आत्मविश्वासाला इच्छाशक्तीची जोड दिली तर नक्कीच व्यसनमुक्ती होऊ शकते, असे प्रतिपादन पुण्याच्या परिपूर्ती व्यसनमुक्ती सल्ला, मार्गदर्शन आणि प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष झुंबरराव खरो यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या रासेयो स्थापना दिनानिमित्त कार्यक्रमात व्यसनमुक्ती आणि आरोग्य या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. या प्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप मुळूक, प्रा. रूपाली वायाळ, प्रा. धनंजय वाघ, चाकणच्या मिंडा स्टोनरीज इन्स्ट्रूमेंट लि. चे सुरक्षा अधिकारी गजानन जाधव, अभिजीत भालेराव, अकबर शेख आणि रासेयोचे सुमारे दोनशे विद्यार्थी उपस्थित होते.

झुंबरराव खरो पुढे म्हणाले की, टाइमपास, सहज गंमत, ताणतणाव, व्यसनी मित्रांची संगत अशा विविध कारणांनी अनेक तरुण तंबाखू, गुटखा, बिडी-सिगारेट, दारू व अंमलीपदार्थ या व्यसनांना बळी पडत आहेत. त्याचा त्यांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत आहे. अशावेळी व्यसनी व्यक्तीचा तिरस्कार करण्यापेक्षा त्याला या व्यसनांच्या दुष्परिणामांची माहिती करून द्यायला हवी. व्यसनमुक्तीचे फायदे सांगताना त्यांनी पैशाची बचत, कौटुंबिक सलोखा आणि घर व घराबाहेरील आदर्श इत्यादी बाबींवर भर दिला. व्यसनांचे दुष्परिणाम सांगताना आरोग्यहानी बरोबरच मद्यपानामुळे रस्ते अपघातात मृत्यू पावणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या लक्षणीय आहे.



राजगुरूनगर : 'व्यसनमुक्ती आणि आरोग्य' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना झुंबरराव खरो

व्यसनमुक्त व्हा, निर्व्यसनी राहा आणि आनंदाने जीवन जगा असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे यांनी केले तर प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे  
प्रसिद्धी विभाग प्रमुख